RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १४७] बुधवार, डिसेंबर १, २०२१/अग्रहायण १०, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**जलसंपदा विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.**

क्रमांक मजनिप्रा-२०२०/(२७/२०२०)/जसं(आस्था).—ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी शासन अधिसूचना, जलसंपदा विभाग क्रमांक मजनिप्रा-२०२०/(२७/२०२०)/जसं(आस्था), दिनांक १८ मे, २०२१ अन्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा.१८) मधील तरतुदीनुसार गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त प्राधिकरण " असा करण्यात आला आहे.) सदस्य म्हणून श्रीमती श्वेताली अभिजीत ठाकरे यांची अर्थव्यवस्था क्षेत्रातील तज्ज्ञ आणि डॉ. विनय नारायण परांजपे यांची विधि क्षेत्रातील तज्ज्ञ या पदावर नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, डॉ. विनय नारायण परांजपे, विधि क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी त्यांना सद्यःस्थितीत सदर प्राधिकरणाच्या सदस्य (विधि) या पदाचा कार्यभार स्विकारणे शक्य होत नसल्याचे कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांना डॉ. साधना सुनिल महाशब्दे यांना सदर प्राधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्त करणे उचित वाटले आहे ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (५) आणि कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड(ङ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार उक्त प्राधिकरणाचे सदस्य (विधि क्षेत्रातील तज्ज्ञ) म्हणून डॉ.साधना सुनिल महाशब्दे यांची त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जो दिनांक आधी येईल

त्या दिनांकापर्यंत नियुक्ती करीत आहेत आणि याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सदर अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करीत आहे :—

सदर अधिसूचनेमधील, अनुक्रमांक (२) येथे पुढीलप्रमाणे खंड दाखल करण्यात येत आहे :—

"(२) डॉ. साधना सुनिल महाशब्दे सदस्य ;".

(विधि क्षेत्रातील तज्ज्ञ)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजय कोहिरकर,**
शासनाचे सचिव.

## WATER RESOURCES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 30th November, 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.

No.MWRRA-2020/(27/2020)/WR(Estt).—Whereas, the Governor of Maharashtra has, *vide* the Government Notification, Water Resources Department, No. MWRRA-2020/(27/2020)/WR(Estt), dated the 18th May 2021, appointed Smt. Shwetali Abhijeet Thakare, an expert from the field of economics and Dr. Vinay Narayan Paranjape, an expert from the field of law, as Members of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (hereinafter referred to as " the said Authority ") constituted under the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005);

And whereas, Dr.Vinay Narayan Paranjape, an expert from the field of law, has communicated that it would not be possible for him at this stage to assume the role of member (Law) of the said Authority ;

And whereas, the Governor of Maharashtra considered it expedient to appoint an expert from the field of law, as a member of the said Authority ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 3 read with clause (e) of sub-section(*1*) of section 4 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005) and of all other powers enabling it in that behalf, the Governor of Maharashtra hereby, on the recommendation of the Selection Committee constituted under sub-section (*1*) section 5 of the said Act, appoints Dr.Sadhana Sunil Mahashabde, an expert from the field of law, as a member of the said Authority for a term of three years from the date on which she enters upon her office or till she has attained the age of seventy years, whichever is earlier, and for that purpose hereby amends the said Notification as follows, namely :—

In the said Notification, for entry at serial number (2), the following entry shall be substituted, namely :—

" (2) Dr. Sadhana Sunil Mahashabde, Member ; ".
(Expert from field of law)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJAY KOHIRKAR,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.